



# परळी संघर्षनेता

समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता

https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 122 | बुधवार दि. 27 मे 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060






## लोकनेते मुंडे साहेबांची पुण्यतिथी आपापल्या गावात, घरीच करा - ना.पंकजाताई मुंडे यांचे आवाहन

### देशातील सद्यस्थिती व पंतप्रधान मोदी यांच्या इंधन बचतीच्या आवाहनाला प्रतिसाद



मुंबई, दि. 26--- लोकनेते गोपीनाथराव मुंडे सर्वांचे श्रद्धास्थान व ऊर्जास्थान आहे. दरवर्षी तीन जून आला की प्रत्येकाच्या मनात हुरहूर लागून जाते. आपल्या लोकनेत्याच्या आठवणीने आजही लाखोंचा जनसागर गोपीनाथ गडावर तीन जूनला दाखल होतो. मात्र सद्य परिस्थितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद त्याचबरोबर पेट्रोल डिझेलचा वापर कमी करून सर्वांची गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने गोपीनाथ गडावर न येता सर्वांनी आहे त्या ठिकाणी, आपापल्या घरात व गावात पुण्यतिथी करावी असे आवाहन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी केले आहे.

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांची 3 जून ला पुण्यतिथी असते. त्या निमित्ताने गोपीनाथराव मुंडे यांची समाधी असलेल्या गोपीनाथ गडावर दरवर्षी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून जनसागर येत असतो.मात्र गोपीनाथराव मुंडे यांना अभिप्रेत असलेली जनकल्याणाची कामे करणे, ज्यांचा कोणी वाली नाही त्यांचा वाली होणे, ज्यांची वाणी नाही त्यांची वाणी होण्याचा प्रयत्न करणे हे विचार आपण पुढे घेऊन जाण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहोत. तीन जून जवळ आला की प्रत्येकाला हुरहूर लागलेली असते. मात्र सध्य परिस्थिती पेट्रोल डिझेलचा तुटवडा व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले आवाहन या दृष्टीकोनातून कोणाचीही गैरसोय होणार नाही यासाठी आपण गोपीनाथ

पान 3 वर

## राष्ट्रवादीतील धुसफूस शिगेला, मुंबईत असूनही पटेलांची दांडी, तटकरे आणि भुजबळांमध्ये बैठकीतच जुंपली

अजितदादांच्या निधनानंतर राष्ट्रवादी पक्षातील वरिष्ठ नेत्यांची पक्षातील नाराजी वाढतच चालल्याचे चित्र आहे. पक्षाच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार या मायलेकांनी घेतलेल्या काही निर्णयांनी पक्षातील वरिष्ठ नेत्यांची फळी नाराज असल्याचे पुढे आले असतानाच आज राष्ट्रवादी पक्षाच्या महत्वाच्या बैठकीला वरिष्ठ नेते प्रफुल पटेल मुंबईत असूनही गैरहजर असल्याने विविध तर्कविर्तकांना उधाण आले आहे. त्यातच या बैठकीत ज्येष्ठ नेते छगन भुजबळ आणि सुनील तटकरे यांच्यातही भर बैठकी खंडाजंगी झाल्याचे वृत्त आहे.



मुंबई राष्ट्रवादी काँग्रेसच्या आजी माजी आमदारांची महत्वाची बैठक पक्षाध्यक्ष सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली देवगिरी बंगल्यावर आयोजित करण्यात आली होती. पक्षाचे विधानसभेचे आणि विधान परिषदेचे आमदार या

पान 3 वर

## आज ठळक

### उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी पहिला उमेदवारी अर्ज दाखल



धाराशिव : धाराशिव उस्मानाबाद लातूर बीड या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आज पहिला उमेदवारी अर्ज दाखल झाला असून कळंब नगरपालिकेचे गटनेते संजय मुंदडा यांनी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून हा उमेदवारी अर्ज दाखल केल्या आहे.

या मतदारसंघात महाविकास आघाडीकडून उमेदवारी कोणत्या पक्षाला द्यायची याचा खल सुरु असतानाच खासदार ओमराजे निंबाळकर आणि आमदार कैलास पाटील यांच्या जवळच्या उद्धव ठाकरे गटाच्या गटनेत्याने फॉर्म भरल्याने महाविकास आघाडीत बिघाडी झाली आहे.

महाविकास आघाडीकडे पूर्ण संख्याबळ असून मीच महाविकास आघाडीचा उमेदवार असून विजयी होणार असल्याचा दावा फॉर्म भरणारे उमेदवार संजय मुंदडा यांनी केला आहे. तसेच या मतदारसंघाचे आमदार म्हणून ज्यांनी प्रतिनिधित्व केले त्या सुरेश धस यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेचे कुठलेच प्रश्न सोडवले नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे

पान 3 वर

### कांदा कापल्यावर अश्रू येणार नाही अशी लोक आंदोलन करतायत.. देवेंद्र फडणवीस यांची जोरदार टीका



इराण आणि अमेरिका युद्धाचे परिणाम भारतात बघायला मिळत आहेत. पेट्रोल आणि डिझेलचा तुटवडा बघायला मिळतोय. यादरम्यानच सरकारकडून मोठे निर्णय घेतले जात आहेत. पेट्रोल आणि डिझेलच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. त्यामध्ये राज्यात काही जिल्ह्यांमध्ये पेट्रोल आणि डिझेलचा तुटवडा निर्माण झाला. इंधन दरवाढीमुळे अनेक गोष्टींवर परिणाम होत आहे. कालच पेट्रोल आणि डिझेलच्या भावात वाढ झाली. आज सीएनजीचे भाव वाढले. जर इराण आणि अमेरिका युद्ध पुढील काही दिवस चालले तर त्याचे वाईट परिणाम जगातील अनेक देशांना भोगावे लागतील. मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटले होते की, राज्यात पुढील एक महिना पुरेल इतका पेट्रोल आणि डिझेलचा साठा आहे. काही जिल्ह्यांमध्ये पेट्रोल आणि डिझेलचा तुटवडा होण्यामागची कारणेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितली.

नुकताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कांद्याच्या मुद्द्यावर मोठे विधान केले. देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले की, कांद्याच्या दरात कालच केंद्राकडून 3.50पैसे वाढ करण्यात आली. कांदा प्रश्नी उद्या संध्याकाळी दिल्लीत बैठक होणार आहे. काही लोक विनाकारण यासंदर्भात राजकारण करु पाहतायत. तुमच्या काळात कांद्याचा दराचा प्रश्न होता. विरोधकांचं आंदोलन राजकीय आंदोलन असल्याचेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. पुढे त्यांनी म्हटले

पान 3 वर

## परळीत शिंदे सेनेचे नेते शिवाजी शिंदे यांच्यावर जीवघेणा हल्ला

### कोयत्याने सपासप वार; हाताची बोटे निकामी, प्रकृती चिंताजनक

परळी प्रतिनिधी परळी शहरातील मोंढा बाजार परिसरात शिंदे सेनेचे ज्येष्ठ नेते शिवाजी शिंदे यांच्यावर काही अज्ञात हल्लेखोरांनी धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात शिवाजी शिंदे गंभीर जखमी झाले असून त्यांच्या हाताची बोटे निकामी झाल्याची माहिती समोर आली आहे. प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ (स्वराती) रुग्णालयात हलविण्यात आले असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, शिवाजी शिंदे हे नेहमीप्रमाणे मोंढा मार्केट परिसरातील आपल्या 'रिद्धी सिद्धी' दुकानात पत्नीसह उपस्थित होते. दुपारच्या सुमारास ते हॉटेलमध्ये असताना अचानक काही तरुण तेथे आले. त्यांनी कोणतीही पूर्वसूचना न देता थेट कोयत्याने शिवाजी शिंदे यांच्यावर सपासप वार करण्यास सुरुवात केली. हल्लेखोरांनी थेट डोक्यावर वार करण्याचा प्रयत्न केला. मात्र स्वतःचा बचाव करताना शिंदे यांनी तो वार हातावर झेलला. यात त्यांच्या हाताला गंभीर दुखापत झाली असून हाताची बोटे निकामी झाल्याचे सांगण्यात येत आहे. हल्लेखोरांनी त्यांच्या हातापायांवरही वार केले. दरम्यान, शिंदे यांना वाचविण्यासाठी मध्ये पडलेल्या

पान 3 वर

## वारंवार मागणी करुनही भाजप अर्थ खाते देत नाही, सुनेत्रा पवार यांची नाराजी



राष्ट्रवादीचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना तीनच दिवसात उपमुख्यमंत्री पदाची शपथ देण्यात आली. त्यानंतर 13 दिवसांनी त्यांनी प्रत्यक्ष पदभार स्वीकारला होता. सुनेत्रा पवार यांना पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष देखील झाल्या.महायुतीत भाजपाचा सहकारी असलेल्या अजितदादांच्या राष्ट्रवादीला मात्र डावलेले जात असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना वाटत आहे. कारण आज त्यांनी पक्षाच्या बैठकीत अर्थ खाते राष्ट्रवादीला देत नसल्याने खंत व्यक्त केली आहे. सुनेत्रा पवार यांनी थेट असे वक्तव्य केल्याने राज्यातील राजकारण आता कोणते वळण घेणार

पान 3 वर

## युवा सेनेचे कैलास कावरे यांनी सिरसाळा भोगवटाधारकांचा प्रश्न उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मुंबईत लावून धरला



### जिल्हाधिकारी कटिबद्ध

परळी प्रतिनिधी - सिरसाळा येथील भोगवटाधारकांचा गेल्या चार दशकांपासून प्रलंबित असलेला मालकी हक्काचा प्रश्न आज थेट राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर युवासेनेचे परळी विधानसभाप्रमुख कैलास कावरे यांनी हा प्रश्न लावून धरताच राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार एकनाथजी शिंदे यांच्या वतीने तातडीने हालचाली झाल्या.

आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर युवासेना परळी विधानसभाप्रमुख कैलास कावरे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांची भेट घेऊन त्यांच्याकडे सिरसाळा येथील भोगवटाधारकांच्या ज्वलंत प्रश्नाकडे लक्ष वेधले. सिरसाळा शहरातील गेल्या अनेक वर्षांपासून मालकी हक्काच्या पीटीआर अभावी शासकीय योजनांपासून येथील नागरिकांना वंचित राहावे लागत असल्याने कैलास कावरे यांनी हा प्रश्न मांडताच, शिंदे साहेबांनी निर्देश देत साहेबांचे विशेष कार्यकारी अधिकारी यांनी तात्काळ बीड येथील जिल्हाधिकारी यांना फोनद्वारे सूचना दिल्या. सिरसाळा

पान 3 वर

## स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषदेसाठी परळीतूनही उमेदवारी?

- विधानपरिषदेसाठी माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख इच्छुक; कार्यकर्त्यांकडून उमेदवारीची जोरदार मागणी

परळी | प्रतिनिधीधाराशिव-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परळीचे माजी नगराध्यक्ष दीपक नाना देशमुख यांच्या नावाची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे सक्रिय सदस्य असलेल्या दीपक देशमुख यांनी निवडणुकीसाठी उमेदवारी अर्जही विकत घेतल्याची माहिती समोर आली असून पक्षाकडे उमेदवारीची मागणी देखील करण्यात आली आहे.

धाराशिव-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मोठा जनसंपर्क, विविध पदाधिकाऱ्यांशी असलेले निकटचे संबंध आणि कार्यकर्त्यांमधील मजबूत पकड यामुळे दीपक देशमुख यांचे नाव चर्चेत आले आहे. परळी नगरपालिकेच्या नगराध्यक्ष कारकीर्दीत त्यांनी विविध विकासकामांवर भर दिला होता. त्यामुळे बीड, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रतिनिधींमध्ये त्यांचा चांगला संपर्क असल्याचे मानले जाते. गेल्या अनेक

पान 3 वर



## सेवानिवृत्त शिक्षक शिवाजी निळे यांचे निधन



परळी (प्रतिनिधी) - जिल्हा परिषद शाळेचे सेवानिवृत्त शिक्षक शिवाजी नामदेवराव निळे यांचे अल्पशा आजाराने सोमवार दि. 25 मे 2026 रोजी रात्री लातूर येथे उपचार सुरु असताना निधन झाले. मृत्यूसमयी ते 60 वर्षाचे होते. इंजि. संकेत निळे यांचे ते वडील होते.

मंगळवारी दि. 26 रोजी सकाळी 11 वाजता सार्वजनीक स्मशानभूमी परळी येथे त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शिक्षक, वकील,पत्रकार, व्यापारी आदी मोठ्या संख्येने

पान 3 वर

## संस्कार प्राथमिक शाळेच्या जुन्या आठवणींना उजाळा; सातवीच्या 1999-2000 बॅचचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न







**25 वर्षांनी जुन्या मित्रांची भेट, गुरुजनांचा सन्मान आणि यशस्वी जीवनप्रवासाचा प्रेरणादायी सोहळा**

परळी (प्रतिनिधी) – शहरातील श्री पद्मावती शिक्षण संस्था संचलित संस्कार प्राथमिक शाळेच्या शैक्षणिक वर्ष 1999 - 2000 या वर्षातील इयत्ता सातवी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा भव्य स्नेहमेळावा पद्मावती आनंदी, उत्साही आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला. आजपर्यंत आपण विभागांमध्ये दहावी-बारावीच्या माजी विद्यार्थ्यांचे अत्यंत स्नेहमेळावे मोठ्या उत्साहात होताना पाहिले आहेत. मात्र, यापेक्षा वेगळा आणि आगळावेगळा उपक्रम राबवत संस्कार प्राथमिक शाळेच्या शैक्षणिक वर्ष 1999-2000 च्या इयत्ता सातवीच्या माजी विद्यार्थ्यांनी तब्बल 25 वर्षांनंतर

पान 3 वर

# माई रमाई: मातृत्वाचे महाकाव्य

## (27 मे: माता रमाई आंबेडकर स्मृती दिन विशेष.)

_काका म्हणाले की मुले, तीन दिवसांपासून उपाशी आहेत. वसतिगृहाला अन्नधान्यासाठी मिळणारे अनुदान अजून मिळालेले नाही. हे सांगताना वराळे काकाचा कंठ दाटून आला. तत्क्षणी रमाईने कपाटातील डब्यातील सोन्याच्या बांगड्या वराळे काकांना दिल्या आणि म्हणाल्या, या बांगड्या विका किंवा गहाण ठेवा, पण मुलांच्या जेवणाची त्वरित सोय करा. यावर बाबासाहेब काय म्हणतील याचा त्यांनी क्षणभरही विचार केला नाही. सोन्याच्या मूल्यापेक्षा त्यांच्या मनातील मुलांप्रती करुणा मौल्यवान ठरली. अशिक्षित असूनही बाबासाहेबांच्या कर्तृत्वाला साजेशी व स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची क्षमता माईंत होती. अशी प्रेरणादायी संकलित माहिती श्री. एन. कृष्णकुमार, से.नि.अध्यापक. सदर लेखात देताहेत... संपादक_




भारतरत्न डॉ.बाबासाहेब तहानभूक विसरून पुस्तक वाचनात दंग असत. एकदा जेवणाची वेळ झाली असता रमाईंनी त्यांच्यापुढे जेवणाचे ताट ठेवले. साहेबांचे जेवण आटोपले असेल वाटून ताट उचलण्यासाठी त्या खोलीत जरा वेळानेच गेल्या, मात्र ताट तसेच उघडे. न राहून माईंनी त्यातल्या एका पुस्तकाचे पान उघडले आणि म्हणाल्या- या पुस्तकात नवऱ्याने आपल्या बायकोशी कसे वागावे, कुटुंबाशी कसे वागावे हे लिहिले असेल तेवढेच मला वाचून दाखवा. डॉ.बाबासाहेब म्हणतात- अगं वेडे, नवऱ्यानं संसार कसा करायचा, हे काही पुस्तकात लिहिलेल नसतं. डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील प्रत्येक संकटात रमाई संघर्षरत राहिल्या, हे सर्वश्रुत आहे. त्यांनी आपल्या वैवाहिक जीवनात अत्यंत हालअपेष्टा, दु:ख, गरिबी सोसत त्यांवर मात केली. बाबासाहेबांपर्यंत दु:खाची झळ पोहचू दिली नाही. आपल्या संसारात आदर्श पत्नी, सून, माता या भूमिका त्यांनी अपार कष्टाने पार पाडल्या. कधी तक्रार नाही की कुठे त्याची वाच्यता नाही. अथांग दु:खाचे कधी भांडवल केले नाही. घरातील आर्थिक संकटाचा कोणासही थांगपत्ता लागू दिला नाही. एका मातेसाठी तिचा मुलगा मृत्यू पावणे यासारखे जगात दुसरे दु:ख नाही. त्यांचे तर एकापाठोपाठ तीन मुलगे आणि एक मुलगी औषधपाण्याविना तडफडून दगावले. म्हणूनच माईंच्या त्यागाची थोरवी गाताना कवी यशवंत मनोहर म्हणतात- रमाई मातृत्वाचे महाकाव्यच होय, जीवनाचा तो एक संपूर्ण दु:खाशय होता.

माता रमाई भीमराव आंबेडकर या विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पहिल्या पत्नी होत. डॉ.आंबेडकर अनुयायी त्यांना आईची उपमा देत रमाई संबोधतात. माता रमाई आंबेडकर यांचा जन्म दि.7 फेब्रुवारी 1898 रोजी एका गरीब कुटुंबात झाला होता. त्यांचे वडील भिकूजी धुत्रे- वलंगकर व आई रुक्मिणी यांच्यासह रमाई दाभोळजवळील वणदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये राहत. त्यांना 3 बहिणी व एक भाऊ- शंकर अशी चार भावंडे होती. मोठी बहीण दापोलीत दिली होती. भिकूजी दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या बाजारापर्यं पोहचवत असत. त्यांना छातीचा त्रास होता. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे आजारपणाने निधन झाले. आईच्या जाण्याने कोवळ्या रमाईच्या मनावर आघात झाला. धाकटी बहीण गौरा व भाऊ शंकर अजाण होते. काही दिवसात वडील भिकूजी यांचेही निधन झाले. पुढे वलंगकर काका व गोविंदपुरकर मामा मुलांना घेऊन मुंबईला भायखळा मार्केटच्या चाळीत रहायला गेले. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन घडविण्यात रमाईंचा सिंहाचा वाटा आहे. रमाई म्हणजे बाबासाहेबांची सावलीच होती. त्यांनी आपले जीवन बाबासाहेबांच्या कार्यांप्रती समर्पित केले नसते तर बाबासाहेबांना शून्यातून जग निर्माण करता आले नसते, हे नाकारता येत नाही. मुंबईतील भायखळा मार्केटमधील मासळी बाजार येथे बुधवार दि.4 एप्रिल 1906 रोजी त्यांचे भीमरावांसोबत लग्न झाले. त्यांच्या जीवनाच्या अनेक हृदयदायक घटना सांगता येतील. एका प्रसंगी बाबासाहेबांच्या सत्कार समारंभात माईंना नेसायला लुगडे नव्हते. तेव्हा त्यांनी बाबासाहेबांचा फेटा लुगडे म्हणून घातला. गरिबीची केवढी मोठी शोकांतिका! पण रमाईंच्या त्यागामुळे आज देशातील लाखो महिलांचे जीवनच बदलून गेले आहे. माई संसारात रमल्या, परंतु भीमराव पुस्तकांत रमले.

डॉ.बाबासाहेब व माता रमाई राजगृहात राहत असताना बाबासाहेबांना अचानक विदेशात जावे लागत होते. बाबासाहेबांनी धारवाडच्या वराळे या आपल्या मित्राकडे काही दिवसासाठी माईंना पाठविले. वराळे काका लहान मुलांचे वसतिगृह चालवित होते. त्यांच्या आवारात लहान मुले नेहमी खेळायला येत असत. दोन-चार दिवसांत माईंना त्या लहान मुलांचा लळा लागला. दोन दिवस झाले मुले आवारात दिसली नाहीत, म्हणून माईंनी काकांना विचारले. काका म्हणाले की मुले तीन दिवसांपासून उपाशी आहेत. वसतिगृहाला अन्नधान्यासाठी मिळणारे अनुदान अजून मिळालेले नाही. हे सांगताना वराळे काकाचा कंठ दाटून आला. तत्क्षणी रमाईने कपाटातील डब्यातील सोन्याच्या बांगड्या वराळे काकांना दिल्या आणि म्हणाल्या, या बांगड्या विका किंवा गहाण ठेवा, पण मुलांच्या जेवणाची त्वरित सोय करा. यावर बाबासाहेब काय म्हणतील याचा त्यांनी क्षणभरही विचार केला नाही. सोन्याच्या मूल्यापेक्षा त्यांच्या मनातील मुलांप्रती करुणा मौल्यवान ठरली. अशिक्षित असूनही बाबासाहेबांच्या कर्तृत्वाला साजेशी व स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची क्षमता माईंत होती. कष्ट, त्याग, संघर्ष, मातृत्व, प्रेम हे सर्व गुण त्यांच्यात असल्यामुळे बाबासाहेबांचे त्यांच्यावर निस्सीम प्रेम होते. माईंच्या त्यागाविषयी डॉ.बाबासाहेब बहिष्कृत भारतमध्ये लिहितात- आपण परदेशी असताना रात्रंदिवस जिने प्रपंचाची काळजी वाहिली व जिला ती अजूनही करावी लागत आहे. मी स्वदेशी परत आल्यावर माझ्या विपन्नावस्थेत गवताचे भारे स्वत:च्या डोक्यावर वाहण्यातही जिने मागेपुढे पाहिले नाही, अशा अत्यंत ममताळू, सुशील व पूज्य स्त्रीच्या सहवासात दिवसाच्या चोवीस तासातून अर्धा तासही मला घालविता येत नाही. बाबासाहेबांनी व्यक्त केलेली ही खंत मन हेलावून टाकते. सन 1940मध्ये लिहिलेला थॉट्स ऑन पाकिस्तान हा ग्रंथ बाबासाहेबांनी माईंना अर्पण केला आहे. अर्पणपत्रिकेत ते लिहितात- हृदयाचा चांगुलपणा, मनाचा मोठेपणा, चारित्र्याचे शुद्धत्व आणि याशिवाय त्याकाळी कोणी मित्र नसलेल्या दिवसात आमच्या वाट्यास आलेले दारिद्र्य आणि विवंचना मनोधैर्याने व तत्परतेने सहन करण्याची जिने तयारी दर्शाविली त्या रामूबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा ग्रंथ मी तिला अर्पण केला आहे.

विश्वरत्न डॉ.बाबासाहेबांच्या जीवनात अत्यंत कठीण काळात रमाईने त्यांना खंबीरपणे साथ दिल्यामुळेच अस्पृश्यांचे कैवारी डॉ.बाबासाहेबांना आपल्या कोट्यवधी अस्पृश्य बांधवांचे जीवन फुलविता आले. दि.27 मे 1935 रोजी जगन्माता रमाईंचे मुंबई येथे निर्वाण झाले.

!! माता रमाई व त्यांच्या अभूतपूर्व त्यागाला त्रिवार दंडवत प्रणाम जी !!

**श्री. एन. कृष्णकुमार, से.नि. अध्यापक.**
**(भारतीय थोरपुरुषांचे जीवनचरित्र अभ्यासक)**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली,**

# सामान्य माणूस विचारतोय, भारत खरोखर किती स्वयंपूर्ण आहे?

**— डॉ. भारत कऱ्हाड**



आज “आत्मनिर्भर भारत”, “मेक इन इंडिया” आणि “भारत जगाची गरज बनत आहे” अशा घोषणा मोठ्या प्रमाणावर ऐकायला मिळतात. सोशल मीडिया, राजकीय व्यासपीठे आणि विविध माध्यमांमधून भारताच्या प्रगतीचे मोठे चित्र उभे केले जाते. पण या सगळ्यामध्ये सामान्य माणसाच्या मनात एक साधा पण महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो — भारत खरोखर किती स्वयंपूर्ण आहे?

हा प्रश्न विचारताना भावनेपेक्षा वास्तव समजून घेणे आवश्यक आहे. कारण कोणताही देश पूर्णपणे स्वयंपूर्ण नसतो. आजची जागतिक अर्थव्यवस्था ही “परस्पर अवलंबित्वावर” चालते. प्रत्येक देश काही गोष्टी तयार करतो, काही आयात करतो आणि काही निर्यात करतो. भारतही त्याला अपवाद नाही.

भारताने अनेक क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती केली आहे, हे नाकारता येणार नाही. औषधनिर्मिती क्षेत्रात भारताला “जगाची फार्मसी” म्हटले जाते. भारतातून जगभर स्वस्त आणि दर्जेदार जेनेरिक औषधे निर्यात होतात. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात भारतीय इंजिनिअर्स आणि आयटी कंपन्यांनी जगात मोठे स्थान निर्माण केले आहे. मोबाईल उत्पादन, रेल्वे, संरक्षण क्षेत्र, अवकाश संशोधन आणि डिजिटल व्यवहारांमध्येही भारताची प्रगती दिसून येते.पण दुसऱ्या बाजूला काही कडू सत्येही आहेत. भारत अजूनही कच्च्या तेलासाठी मोठ्या प्रमाणावर परदेशांवर अवलंबून आहे. पेट्रोल-डिझेल बनवण्यासाठी लागणारे कच्चे तेल भारताला बाहेरून आयात करावे लागते. सोनं, इलेक्ट्रॉनिक चिप्स, प्रगत तंत्रज्ञान, सेमीकंडक्टर आणि औषधनिर्मितीसाठी लागणारा काही कच्चा मालही परदेशातूनच येतो. म्हणजेच आपण अंतिम उत्पादन तयार करत असलो, तरी त्यामागील मूलभूत तंत्रज्ञान किंवा साहित्य अनेकदा बाहेरून येते.

मोबाईल उत्पादनाचे उदाहरण पाहिले तर भारतात लाखो मोबाईल तयार होतात; पण त्यातील स्क्रीन, प्रोसेसर, चिप्स आणि इतर महत्त्वाचे पार्ट्स मोठ्या प्रमाणावर चीन, तैवान किंवा इतर देशांतून येतात. त्यामुळे भारतात उत्पादन होते, पण पूर्ण उत्पादन साखळी अजूनही स्वदेशी झालेली नाही.याच ठिकाणी “स्वावलंबन” आणि “असेंब्ली” यामधील फरक समजून घ्यावा लागतो. फक्त वस्तू जोडणे म्हणजे पूर्ण आत्मनिर्भरता नाही. खरे स्वयंपूर्ण राष्ट्र तेच असते जे संशोधन, तंत्रज्ञान, उत्पादन आणि कच्चा माल या सर्व क्षेत्रांत मजबूत असते.भारताच्या प्रगतीबाबत आणखी एक वास्तव समजून घ्यायला हवे. जग भारताकडून वस्तू घेतं, कारण भारत अनेक गोष्टी तुलनेने स्वस्त आणि चांगल्या दर्जात पुरवतो. म्हणजेच भारताची ताकद सध्या “कमी खर्चातील उत्पादन” आणि “मोठे मनुष्यबळ” यात अधिक आहे. हे महत्त्वाचे आहे; पण महासत्ता होण्यासाठी केवळ स्वस्त उत्पादन पुरेसे नसते. त्यासाठी संशोधन, नवकल्पना आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान आवश्यक असते.याचा अर्थ भारत काहीच करत नाही असा अजिबात नाही. उलट, भारत हळूहळू उत्पादन क्षेत्र वाढवत आहे. “मेक इन इंडिया”, “पी एल आय स्कीम”, सेमीकंडक्टर प्रकल्प, संरक्षण क्षेत्रातील स्वदेशीकरण, डिजिटल इंडिया यांसारख्या उपक्रमांमुळे बदल सुरु आहेत. पण ही प्रक्रिया दीर्घकालीन आहे. चीनला जगाची फॅक्टरी बनण्यासाठी अनेक दशके लागली; भारतालाही वेळ लागणार आहे.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण वास्तव स्वीकारले पाहिजे. अति आत्मस्तुतीही चुकीची आणि अति नकारात्मकताही चुकीची. भारत अनेक क्षेत्रांत पुढे जात आहे, पण अजूनही अनेक बाबतीत परावलंबी आहे. ही उणीव मान्य करून शिक्षण, संशोधन, उद्योग, कौशल्य विकास आणि तंत्रज्ञानावर भर दिला, तरच भारत खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर होऊ शकेल.

आजचा भारत हा पूर्णपणे स्वयंपूर्ण नसला, तरी स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करणारा देश नक्कीच आहे. त्यामुळे प्रचारापेक्षा प्रामाणिक प्रयत्नांची, घोषणांपेक्षा संशोधनाची आणि भावनांपेक्षा वास्तव स्वीकारण्याची सध्या खरी गरज आहे.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**



# माती परीक्षण : संतुलित खत व्यवस्थापनाची गुरुकिल्ली

**प्रा. प्रविण बापूराव मांजरे, प्रा. अक्षय काकडे प्रा. शैलेश रुद्राक्ष**
**कृषितज्ञ, ग्लोबल विकास ट्रस्ट, सिरसाळा, ता. परळी जि. बीड**
**9881881788, 8888348050**

खरीप हंगाम हा भारतीय शेतीचा कणा मानला जातो. पावसाच्या आगमनाबरोबरच शेतकरी खरीप पिकांच्या लागवडीसाठी तयारीला सुरुवात करतात. अधिक उत्पादन मिळविण्याच्या उद्देशाने अनेकदा शेतकरी खतांचा अंदाजाने वापर करतात; परंतु जमिनीतील अन्नद्रव्यांची खरी स्थिती माहिती नसल्यामुळे उत्पादनात अपेक्षित वाढ होत नाही. उलट जमिनीची सुपीकता कमी होणे, उत्पादन खर्च वाढणे आणि अन्नद्रव्यांचे असंतुलन निर्माण होणे अशा समस्या उद्भवतात. आजच्या आधुनिक व वैज्ञानिक शेतीमध्ये “माती परीक्षण” हे उत्पादनवाढीचे प्रभावी साधन मानले जाते. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने खरीप हंगामाची सुरुवात माती परीक्षण करूनच करावी, जेणेकरून कमी खर्चात अधिक उत्पादन व दीर्घकालीन जमिनीची सुपीकता टिकवून ठेवणे शक्य होईल.

जमीन ही शेतकऱ्याची खरी संपत्ती मानली जाते. निरोगी जमीन ही भरघोस उत्पादनाची गुरुकिल्ली आहे. परंतु सध्या शेतीमध्ये रासायनिक खतांचा वाढता वापर, सतत एकाच प्रकारच्या पिकाची लागवड, सेंद्रिय पदार्थांचा अभाव, अति सिंचन चुकीच्या मशागतीच्या पद्धती, मृदा धूप आणि इतर बाबींमुळे जमिनीचे आरोग्य खालावत चालले आहे. परिणामी उत्पादन घटणे, पिकांमध्ये अन्नद्रव्यांची कमतरता दिसून येणे, जमिनीची सुपीकता कमी होणे अशा समस्या निर्माण होत आहेत. अशा परिस्थितीत माती परीक्षण हे शाश्वत आणि वैज्ञानिक शेतीसाठी अत्यंत महत्त्वाचे साधन ठरते.

आपण पाहतो कि सध्या जमिनीची स्थिती खूपच बदललेली आहे. जमिनीचे आरोग्य म्हणजे जमिनीत पिकांच्या वाढीसाठी आवश्यक असलेले भौतिक, रासायनिक आणि जैविक गुणधर्म संतुलित अवस्थेत असणे होय. जमिनीमध्ये योग्य प्रमाणात सेंद्रिय कर्ब, अन्नद्रव्ये, सूक्ष्मजीव, पाणी धारण क्षमता आणि हवा खेळती राहणे आवश्यक असते. परंतु रासायनिक खतांचा अति वापर आणि सेंद्रिय खतांचा कमी वापर यामुळे जमिनीचे आरोग्य बिघडते. जमिनीतील सेंद्रिय कर्ब कमी



झाल्यामुळे माती घट्ट बनत चालली आहे. मातीची सुपीकता, पोत कमी होऊन पाणी धारण क्षमता सुद्धा कमी झाली आहे आणि त्यामुळे कितीही खतांचा वापर केला तरीही उत्पादनात घट येते. प्रती हेक्टरी उत्पादकता कमी होत आहे. यावर उपाययोजना होणे गरजेचे आहे. याकरिता शेतकऱ्यांनी आपल्या मातीचे परीक्षण करून त्याप्रमाणे खत व्यवस्थापन, मशागतीची कामे करणे हि काळाची गरज बनली आहे. माती परीक्षण आणि त्यासंदर्भातील महत्वाच्या बाबी या लेखातून आपण समजून घेऊया.

माती परीक्षण

माती परीक्षण म्हणजे जमिनीतील अन्नद्रव्यांचे, सेंद्रिय कर्बाचे, सामू (pH), क्षारता (EC) आणि इतर भौतिक व रासायनिक गुणधर्मांचे प्रयोगशाळेमध्ये विश्लेषण करणे होय. या परीक्षणामुळे जमिनीतील अन्नद्रव्यांची खरी स्थिती समजते, कोणते घटक किती प्रमाणात उपलब्ध आहेत ते समजते आणि त्यानुसार खत व्यवस्थापन करता येते

माती परीक्षणामध्ये प्रामुख्याने सेंद्रिय कर्ब, सामू, विद्युत वाहकता, नत्र (N), स्फुरद (P), पालाश (K), आणि सूक्ष्मअन्नद्रव्ये यांची तपासणी केली जाते. जमिनीचा सामू (pH) हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे; कारण त्यावर अन्नद्रव्यांची उपलब्धता अवलंबून असते. बहुतेक पिकांसाठी 6.5 ते 7.5 योग्य मानला जातो. या दरम्यान सामू असल्यास सर्व अन्नद्रव्यांची उपलब्धता पिकांना होऊन उत्पादन चांगले मिळते. टाकलेली सर्व खते पिके योग्य प्रमाणात शोषून घेतात. जर सामू जास्त किंवा कमी असेल तर अन्नद्रव्ये जमिनीत असूनही पिकांना उपलब्ध होत नाहीत. ती जमिनीत पडून राहतात. शेतकर्यांना भ्रम होतो कि आपण शेतात खूप साऱ्या खतांचा वापर केला तरी पिक चांगले आले नाही, उत्पादन आले नाही, याचे प्रमुख कारण म्हणजे जमिनीचा सामू असतो. त्यामुळे माती परीक्षणाद्वारे सामू (pH) समजून घेणे अत्यंत आवश्यक असते. त्यानुसार पिक पद्धती आणि उपाययोजना करणे गरजेचे ठरते.

माती परीक्षणाचे फायदे

माती परीक्षणाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे जमिनीची सुपीकता समजते. जमिनीत अन्नघटक किती प्रमाणात उपलब्ध आहेत याची अचूक माहिती मिळते. त्यामुळे कोणते अन्नद्रव्य कमी आहे किंवा कोणते जास्त आहे हे समजते. अनेक वेळा शेतकरी अंदाजाने खतांचा वापर करतात. त्यामुळे काही अन्नद्रव्यांचा अतिरेक होतो तर काहींची कमतरता राहते. माती परीक्षणामुळे ही समस्या टाळता येते. तसेच जमिनीच्या प्रकारानुसार पिकांची निवड योग्य करता येते.

माती परीक्षणामुळे संतुलित खत व्यवस्थापन करता येते. आवश्यक तेवढीच खते वापरता येतात, त्यामुळे उत्पादन खर्च कमी होतो. जमिनीतील सूक्ष्मअन्नद्रव्यांची कमतरता समजल्यामुळे योग्य उपाययोजना करता येतात. मुळांची वाढ सुधारते, फुलधारणा व फळधारणा वाढते आणि उत्पादनात भरघोस वाढ होते. संतुलित पोषणामुळे पिकांची रोगप्रतिकारशक्तीही वाढते. माती परीक्षणामुळे पिकांचे उत्पादन व गुणवत्ता वाढते तसेच जमिनीची सुपीकता टिकून राहते. रासायनिक खतांचा अति वापर टाळल्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण देखील होते.

उत्पादनाच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा हा देखील माती परीक्षणाचा महत्त्वाचा फायदा आहे. योग्य अन्नद्रव्य व्यवस्थापनामुळे फळांचा आकार, रंग, चव आणि टिकाऊपणा सुधारतो. फळपिकांमध्ये बाजारपेठेतील गुणवत्ता राखण्यासाठी माती परीक्षण अत्यंत उपयुक्त ठरते.

मातीचा नमुना घेणे

माती परीक्षणासाठी योग्य नमुना घेणे ही अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. चुकीचा नमुना घेतल्यास परीक्षण अहवाल चुकीचा येऊ शकतो आणि खत शिफारस अयोग्य ठरु शकते. त्यामुळे माती नमुना शास्त्रोक्त पद्धतीने घेणे आवश्यक असते.

मातीचा नमुना केव्हा व कुठून घ्यावा:

1) मातीचा नमुना पिके काढल्यानंतर किंवा पेरणीपुर्वी (सेंद्रिय व रासायनिक खते देण्यापुर्वी) व खते दिल्यानंतर दोन ते तीन महिन्यांनी घ्यावा.

2) मातीचा रंग, जमिनीचा खडकाळपणा, उंच-सखलपणा, पिकातील फरक व बागायत/ जिरायत स्थिती लक्षात घेऊन त्याप्रमाणे शेतीचे वेगवेगळे भाग पाडावेत व त्या प्रत्येक भागाला विशिष्ट क्रमांक द्यावेत. फारच लहान भाग पाडू नयेत. किमान एक एकराचा एक अशा पद्धतीने भाग पाडून नमुना गोळा करावा.

खालील ठिकाणाहून मातीचे नमुने घेऊ नयेत:

1. गुरे बसण्याची व झाडाखालची जागा
2. खते व कचरा टाकण्याची जागा
3. दलदल व घराजवळची जागा
4. पाण्याच्या पाटाखालील जागा.
5. बांधाजवळील व विहीरीजवळील क्षेत्र
6. झाडझुडपाचे क्षेत्र
7. पिकांचे अवशेष जाळलेली जागा

मातीचा नमुना कसा घ्यावा:

नमुना घ्यावयाचा खड्डा चित्र क्र. 1 मध्ये दर्शविल्याप्रमाणे नमुना घ्यावयाच्या क्षेत्रामध्ये माती नमुना घेण्याच्या जागा निश्चित कराव्यात. त्यानंतर किमान 10 ते 12 ठिकाणाहून नमुना घ्यावा. सदरच्या ठिकाणी चित्र क्र. 2 मध्ये दर्शविल्याप्रमाणे इंग्रजी V आकाराचा खड्डा पिकाच्या योग्यतेनुसार 30,60,90 सें.मी. खोल खोदावा व खड्ड्यातील माती बाहेर काढून टाकावी. सोयाबीन, कापूस, मूग, उडीद, ज्वारी, बाजरी, मका, भुईमूग, तीळ, हरभरा, गहू इ. पिकांसाठी 30 सें.मी. खड्डा खोदून त्यातून मातीचा नमुना घ्यावा. तर फळबागेची लागवड करावयाच्या व लागवड झालेल्या क्षेत्रामध्ये वरील प्रमाणेच चित्र क्र. 1,2,3 प्रमाणे कृती करावी. फक्त माती नमुना घ्यावयाच्या ठिकाणी 100 सें.मी. खोलीचा खड्डा घेऊन प्रत्येक 30 से.मी., 60 सें.मी. आणि 90 सें.मी. खोलीसाठी स्वतंत्र नमुना घ्यावा. माती नमुना चाचणीसाठी खड्ड्याच्या कडेची माती चित्रात दर्शविल्याप्रमाणे काढावी. अशा रीतीने चित्र क्र. 1 मध्ये दर्शविल्यानुसार निश्चित केलेल्या जागेच्या ठिकाणची माती नमुन्यासाठी गोळा करावी. गोळा केलेल्या नमूना मातीला माती ओली असल्यास सावलीत वाळवून घ्यावी त्यानंतर मातीला चाळून सर्व मातीचा चित्र क्र. 3 मध्ये दर्शविल्याप्रमाणे ढीग करुन त्याला कपड्यावर, पोत्यावर किंवा ताडपत्रीवर टाकून पसरावे. त्याचे समान 4 भाग करावे. समोरासमोरील दोन भागाची माती काढून टाकावी (उदा. 1 व 3 काढून टाकणे) व उर्वरीत मातीचा पुन्हा ढीग करावा व त्याचे पुन्हा 4 समान भाग करुन समोरासमोरील दोन भागाची भागाची माती काढून टाकावी (आता 2 व 4 हा भाग काढून टाकावा). ही कृती माती अर्धा किलो शिल्लक असेपर्यंत करावी. शेवटी शिल्लक राहिलेली अर्धा किलो मातीचा नमुना परिक्षणासाठी शासकीय प्रयोगशाळेत पाठवावा किंवा कृषि विद्यापीठे, कृषि विज्ञान केंद्र किंवा जिल्हा मृदा परीक्षण प्रयोगशाळा याठिकाणीच पाठवावी जेणेकरुन योग्य आणि शाश्वत नमुना तपासणी केला जाईल. (टीप: सुक्ष्म मुलद्रव्याची तपासणी करणेसाठी लोखंडी हत्याराचा वापर करु नये.)

खालील माहिती कागदावर लिहून तो कागद माती नमुन्याच्या पिशवीत टाकावा.

1) नमुना क्र. 2) नमुना घेतल्याची तारीख 3) शेतकऱ्याचे संपूर्ण नाव व मोबाईल क्रमांक 4) गाव/पोस्ट 5) तालुका 6) जिल्हा 7) सर्व्हे / गट क्र. 8) नमुन्याचे प्रतिनिधीक क्षेत्र 9) बागायत / जिरायत 10) मातीची खोली (सें. मी.) 11) जमिनीचा उतार/सपाट 12) जमिनीची प्रकार - खारवट / चोपण /आम्ल व इतर 13) पाण्याचा निचरा-बरा/वाईट 14) मागील हंगामातील पिक/जात/ आलेले उत्पादन 15) पुढील हंगामातील घ्यावयाचे पिक

मातीचे नमुने मृद चाचणी प्रयोगशाळेकडे वर नमुद केल्याप्रमाणे माहिती लिहून त्या नमुना पिशवीत पाठवावेत.

जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी उपाययोजना

जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी सेंद्रिय खतांचा वापर, पीक फेरपालट, हिरवळीचे खत- धैंचा, बरू, ताग इ., जिवाणूखते आणि मल्चिंग यांसारख्या उपायांचा अवलंब करणे आवश्यक आहे. कंपोस्ट, शेणखत, गांडूळखत यामुळे सेंद्रिय कर्ब वाढतो आणि जमिनीची सुपीकता टिकून राहते. तसेच नत्र स्थिरीकरण करणारे जिवाणू- अझोटोबॅक्टर, रायझोबीयम, अझोस्पिरिलम, असिटोबॅक्टर, स्फुरद विरघळणारे जिवाणू, पालाश विरघळणारे जिवाणू यांसारखी जिवाणूखते वापरल्यास अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढते. खतांचा योग्य वापर होऊन सर्व अन्नद्रव्य पिकांना लागू होतात. जमिनीत साचून असलेली अन्न द्रव्ये पिकांसाठी उपलब्ध स्वरुपात आणून देण्याच महत्वाच काम हे जिवाणू करतात. शिवाय शेतकऱ्यांचा रासायनिक खतावर होणारा खर्च कमी करण्यात सुद्धा जिवाणू खते उपयुक्त ठरतात.

माती परीक्षण हे आधुनिक आणि शाश्वत शेतीचे मूलभूत साधन आहे. प्रत्येक शेतकऱ्याने नियमित माती परीक्षण करून शास्त्रीय पद्धतीने शेती करणे ही काळाची गरज आहे. म्हणून लवकरात लवकर माती परीक्षण करून योग्य नियोजन करण्यावर भर द्यावा.

**(या लेखाचे लेखक ग्लोबल विकास ट्रस्ट, कृषिकूल शेतकरी प्रशिक्षण केंद्र, सिरसाळा, ता. परळी जि. बीड या ठिकाणी कृषितज्ञ म्हणून कार्यरत आहेत.)**

**हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com**

## पान 1 वरुन

गडावर येण्याचे टाळावे.आपापल्या गावात व आपण आहात त्या ठिकाणी लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांची पुण्यतिथी करा.त्यांच्या विचाराला साजेसे उपक्रम साजरे करा. त्यामुळे गोपीनाथ गडावर मोठा कार्यक्रम आयोजित केला जाणार नाही. सर्वांनी पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन व पेट्रोल डिझेल वापर टाळण्यासाठी यावर्षी गावागावात पुण्यतिथी करावी असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले आहे.

------------------------------------

बैठकीला हजर होते. मात्र, मुंबईत असूनही वरिष्ठ नेते प्रफुल पटेल हे या बैठकीला गैरहजर राहिल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. या बैठकीला उपस्थित असलेले ज्येष्ठ नेते सुनील तटकरे यांनी एक महत्वाचा मुद्दा मांडला त्यावरुन ज्येष्ठ नेते छगन भुजबळ आणि तटकरे यांच्या खंडाजंगी झाल्याचेही म्हटले जात आहे.सुनील तटकरे यांनी आपल्यावर आणि प्रफुल पटेल या ज्येष्ठ नेत्यांवर आणि पक्षावर टीका होत असताना पक्षातील इतर कोणताही नेता किंवा नेतृत्व आमचे समर्थन करत नसल्याची खंत यावेळी व्यक्त केली. दादांच्या निधनानंतर आम्ही पक्ष वाढवत असताना आम्ही दोघेच टिकेचे धनी का? असा सवालही त्यांनी केला. सुनील तटकरे यांच्या या मुद्यावर छगन भुजबळांनी आक्षेप घेतला. जे झाले ते झाले ते सोडून द्या आता पुढे जाऊया असा सल्ला भुजबळ यांनी तटकरे यांना दिला. त्यावरुन दोघात खंडाजंगी झाल्याचे म्हटले जात आहे. विशेष म्हणजे तटकरे यांचे भाषण सुरु होण्यापूर्वीच पार्थ पवार यांनी बैठकीतून घेतला काढता पाय घेतल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.प्रफुल पटेल हे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आहेत. त्याच्या पदावरुनही संभ्रम आहे. ते या देवगिरी बंगल्यावर झालेल्या पक्षाच्या महत्वाच्या बैठकीला गैरहजर राहिल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. अजितदादांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचा कारभार सुरु झाला आहे. मात्र, पक्षातील ज्येष्ठ नेत्यांना डावलेले जात असल्याचे पक्षातील दुसऱ्या फळीतील नेत्यांची भावना आहे. तसेच राष्ट्रवादीच्या आमदारांमध्ये या घडामोडीने चलबिचल होत आहे. या सर्व घडामोडीमुळे मध्यंतरी शरद पवार यांना भेटण्यासाठी काही आमदार आणि सुनील तटकरे गेल्याने पक्षामध्ये एकंदर गोंधळाचे वातावरण आहे.

-----------------------------------------------

त्यांच्या पत्नीला देखील मारहाण करण्यात आली.या घटनेनंतर हल्लेखोरांनी हॉटेलमधील गल्ल्यातील रोकडही लुटून नेल्याची माहिती समोर आली आहे. “हल्लेखोरांचा उद्देश मला ठार मारण्याचा होता की लुटण्याचा, हेच समजू शकले नाही,” अशी प्रतिक्रिया जखमी शिवाजी शिंदे यांनी दिली.दरम्यान, या हल्ल्यामागे आदल्या रात्री झालेला किरकोळ वाद कारणीभूत असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. संबंधित तरुणासोबत झालेल्या वादातून हा हल्ला करण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.भरदिवसा मोंढा बाजारासारख्या गजबजलेल्या भागात घडलेल्या या घटनेमुळे व्यापारी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेची माहिती मिळताच संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून तपास सुरु केला असून फरार झालेल्या हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी विविध पथके रवाना करण्यात आली आहेत.

जखमी शिवाजी शिंदे यांच्यावर सध्या अंबाजोगाई येथील स्वराती रुग्णालयात उपचार सुरु असून, त्यांच्या प्रकृतीवर डॉक्टरांकडून बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.

---------------------------------------

याकडे लक्ष लागले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या आजी – माजी आमदारांची आज देवगिरी बंगल्यावर महत्वाची बैठक झाली. या बैठकीत पक्षाच्या वाटचाली बद्दल आणि विधान परिषदेच्या निवडणूकांबद्दल चर्चा करण्यात आली. या बैठकीत पक्षाध्यक्ष सुनेत्रा पवार यांनी अर्थ खाते राष्ट्रवादीला मिळत नसल्याने खंत व्यक्त केली आहे. अजित पवार असताना अर्थखाते त्यांच्याकडे होते. या न्यायाने हे खाते राष्ट्रवादीला मिळावे अशी राष्ट्रवादीची अपेक्षा होती. मात्र, वारंवार मागणी करून सुद्धा भाजपकडून अर्थ खाते दिले जात नसल्याने सुनेत्रा पवार यांनी या बैठकीत नाराजी व्यक्त केल्याचे सूत्रांनी सांगितले.राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांच्याकडे अर्थ खाते होते. अजित पवार यांचे बारामती येथे विमान अपघातात निधन झाले. त्यानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी पतीच्या पश्चात पक्षाची सर्वसूत्रे आपल्या हाती घेतली होती. अजितदादा यांच्या मृत्यूनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थ खाते स्वत:कडे ठेवले आहे. आणि अर्थसंकल्पयी अधिवेशनात स्वत: अर्थसंकल्प मांडला. आज मुंबईतील देवगिरी बंगल्यावर झालेल्या बैठकीत सुनेत्रा पवार यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन झाल्यानंतर तरी राष्ट्रवादीला अर्थ खाते मिळेल अशी अपेक्षा होती. मात्र, वारंवार मागूनही अर्ख खाते भाजप देत नसल्याची खंत सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केली.अर्थ खाते हे महत्वाचे असते.आमदारांना आमदार निधीसह इतर खर्चाचे अधिकार मिळत असल्याने अर्थ खाते आणि गृहखाते अशी महत्वाची खाती स्वतःकडे ठेवण्याचा राजकीय नेत्यांचा कल असतो.

--------------------------------------------

येथे भोगवटधारकांचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून रखडल्याने हा प्रश्न लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी प्रयत्न करावा”, असा स्पष्ट निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने देण्यात आला.विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या फोन सूचनेनंतर बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सुद्धा या प्रकरणी लवकरात लवकर योग्य तो सकारात्मक निर्णय घेण्यासाठी कटिबद्ध असल्याचे यावेळी एकनाथ शिंदे साहेब यांचे विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या शी फोनवर बोलताना सांगितले परळी मतदारसंघातील सर्वात मोठ्या ग्रामपंचायतीपैकी एक असलेल्या सिरसाळा शहरातील गेल्या चार दशकांपासून भोगवटाधारकांना मालकी हक्क मिळावा यासाठी संघर्ष सुरु आहे. “सिरसाळा शहरातील सुमारे 60% पेक्षा अधिक कुटुंबे गेल्या चार दशकांपासून मालकी हक्काच्या PTR अभावी पंतप्रधान आवास योजना, घरकुल योजना व पीक कर्जापासून वंचित आहेत. सातबारा नावावर नसल्याने बँका कर्ज देत नाहीत, त्यामुळे नागरिकांचे प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्र्यांनी दिलेले निर्देश निर्णायक ठरतील, असा विश्वास कावरे यांनी व्यक्त केला हा प्रश्न लवकरात लवकर निकाली लागावा यासाठी सिरसाळा वाशीयांना आशा आहे युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण ,युवासेना जिल्हाप्रमुख ऋषिकेश लोमटे ,सिरसाळा शिवसेनेचे सरपंच शेख नशीब भाई यांच्या मार्गदर्शनाखाली युवा सेना विधानसभाप्रमुख कैलास कावरे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार एकनाथजी शिंदे साहेब यांच्याकडे निवेदन दिले सिरसाळाकरांना न्याय मिळेपर्यंत मंत्रालयाचे दरवाजे ठोठावत राहू” सिरसाळ्यातील भोगवटाधारकांना मालकी हक्क भेटत नाही तोपर्यंत हा लढा शिवसेनेचे सरपंच शेख नशीब भाई यांच्या नेतृत्वाखाली अखेरपर्यंत सुरु ठेवण्याचा निर्धार युवासेनेचे परळी विधानसभाप्रमुख कैलास कावरे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात व्यक्त केला आहे.

--------------------------------------

सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात सातत्याने कार्यरत राहून दीपक देशमुख यांनी स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. विविध सामाजिक उपक्रम, शैक्षणिक क्षेत्रातील योगदान आणि जनसंपर्क यामुळे त्यांना कार्यकर्त्यांचा मोठा पाठिंबा असल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, कार्यकर्त्यांमधून दीपक नाना देशमुख यांनी विधानपरिषद निवडणूक लढवावी, अशी आग्रही मागणी होत आहे. त्यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट या निवडणुकीत नेमका काय निर्णय घेतो आणि उमेदवारी कोणाला मिळते, याकडे संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

----------------------------------

उपस्थित होते.निळे सर यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, दोन भाऊ असा परिवार आहे. निळे कुटुंबीयांवर कोसळलेल्या दुःखात दैनिक संघर्षनेता परिवार सहभागी आहे. आज राख सावडण्याचा कार्यक्रम कै. शिवाजी निळे सर यांचा राख सावडण्याचा कार्यक्रम बुधवार दि. 27 रोजी सकाळी 8 वाजता सार्वजनीक स्मशानभूमी परळी येथे होणार आहे.

-------------------------------------

एकत्र येत स्नेहमेळाव्याचे आयोजन केले. अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील सुवर्णक्षणांना उजाळा देत बालपणीच्या आठवणी पुन्हा एकदा जिवंत केल्या.

कार्यक्रमस्थळी भेटताच जुन्या मित्रांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद, शिक्षकांविषयी व्यक्त झालेला आदर आणि “त्या दिवसांची” आठवण काढताना दाटलेले भावनिक क्षण उपस्थित प्रत्येकाच्या मनाला स्पर्शून गेले. शाळेमध्ये पुन्हा एकदा 1999 - 2000 चा काळ अवतरल्याचे चित्र पाहायला मिळाले.

या विशेष कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री कैलास तांदळे अध्यक्षस्थानी होते. तसेच सचिव श्री दीपक तांदळे, सहसचिव श्रीमती प्रेमिलाताई तांदळे मॅडम, मुख्याध्यापिका सौ. माधुरीताई तांदळे, श्री कराड सर, श्री पाचांगे सर, श्री अनकाडे सर, पर्यवेक्षक श्री इंगळे सर, श्रीम.रणखांब मॅडम, श्री गित्ते सर, श्रीम. साळुंके मॅडम,श्री दैठणेकर सर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी माजी विद्यार्थी दिपक ढाकणे , राज रत्नपारखे, अमोल धुमाळ, गणेश टाक, राजेश देशमाने, शैलेश चांडक, सागर टाक, अमोल राजूरकर, धीरज काळे, विपुल बियाणी, वैभव घोडके, श्रीकांत बाहेती, श्रीकांत शर्मा, धनराज स्वामी, प्रताप सोनवणे, भगवान कराळे, उदय पेंटेवार, विशाल आडेपवार, दिलीप खोशे , अशोक कराळे, मनोज मोरे, अमजद पठाण, संभाजी काटे, उमेश फुलझळके, आनंद रेळेकर, दिपाली आघाव, गौतमी भद्रे, पूजा चांडक, स्वाती, मनीषा, श्वेता दीक्षित, गीता काबरा, दिपाली दहातोंडे, पल्लवी हुलगुंडे, वर्षा अदोडे, चंद्रमणी वाघमारे, गंगाधर रायभोळे, श्रीकांत काकडे, अमोल मुळे, पवन भोयटे आदि उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या यशस्वी वाटचालीचे कौतुक करत “संस्कार प्राथमिक शाळा ही केवळ शिक्षण देणारी शाळा नसून विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देणारे संस्कार मंदिर आहे,” असे गौरवोद्गार काढले.

सन 1999 - 2000 मध्ये इयत्ता सातवी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत असून अनेकजण डॉक्टर, शिक्षक, अभियंते, उद्योजक, शासकीय अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध प्रतिष्ठित पदांवर कार्यरत आहेत. आपापल्या क्षेत्रात यशाचे शिखर गाठूनही शाळेप्रती असलेले प्रेम आणि गुरुजनांविषयीची कृतज्ञता विद्यार्थ्यांच्या बोलण्यातून प्रकर्षाने जाणवत होती.

कार्यक्रमादरम्यान जुन्या आठवणींना उजाळा देताना वातावरण अनेकदा भावुक झाले. वर्गातील गंमती-जमती, शाळेतील सहली, सांस्कृतिक कार्यक्रम, मधल्या सुट्टीतील धम्माल, शिक्षकांचा धाक आणि मित्रांसोबतचे अविस्मरणीय क्षण यांची आठवण काढताना अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटून आले. “मोठी पदे मिळाली, आयुष्य पुढे गेले; पण शाळेतील मैत्री आणि शिक्षकांचे संस्कार हेच आमच्या आयुष्याचे खरे भांडवल आहे,” अशा भावना अनेक माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या. स्नेहमेळाव्यात माजी विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी जुन्या आठवणींना उजाळा देणारे फोटो, संवाद, हास्यकल्लोळ आणि मैत्रीचा उत्स्फूर्त आनंद यामुळे संपूर्ण परिसर भारावून गेला होता. अनेक विद्यार्थ्यांनी शाळेच्या विकासासाठी भविष्यात विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविण्याचा संकल्पही व्यक्त केला.

“एक शाळा... एक संस्कार... आणि आयुष्यभर साथ देणारी मैत्री,” अशी भावना व्यक्त करत सर्व माजी विद्यार्थ्यांनी पुन्हा भेटण्याचा निर्धार केला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेने व माजी विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी सर्वांनी एकत्र येऊन ‘संस्कार’च्या आठवणी कायम जपण्याचा संकल्प करत भावपूर्ण वातावरणात कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

---------------------------------------

संजय मुंदडा कळंब नगर परिषदेचे गटनेते असून त्यांच्या नेतृत्वात कळंब नागरपालिकेत ठाकरे गटाचे नऊ नगरसेवक निवडून आले आहेत. ते या अगोदर कळंब नगरपालिकेचे नगराध्यक्ष राहिले असून ठाकरे गटाचे खासदार ओमराजे निंबाळकर आणि आमदार कैलास पाटील यांचे विश्वासू मानले जातात. गेल्या दोन दशकापासून ते शिवसेनेचे सक्रीयपणे काम करतात.महाराष्ट्र विधान परिषदेतील 16 स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील सदस्यांचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने या जागांसाठी द्वैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. त्यामुळे या मतदारसंघांमध्ये निवडणूक आचारसंहिता तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आली आहे. सोलापूर, अहमदनगर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अमरावती, उस्मानाबाद-लातूर-बीड, परभणी-हिंगोली आणि औरंगाबाद-जालना या 16 स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील सदस्यांचा कार्यकाळ संपल्यामुळे या निवडणुका घेण्यात येणार आहेत.

-----------------------------------

की, कांदा कापल्यावर अश्रू येणार नाही अशी लोक आंदोलन करतायत. उद्या दिल्लीत कांद्यासंदर्भात बैठक आहे. कांदा कापल्यावरही विरोधकांच्या डोळ्यात अश्रू येणार नाहीत, असेही त्यांनी म्हणत जोरदार टीका केली.कांद्याच्या मुद्द्यावर आमदार रोहित पवार आक्रमक भूमिका घेत आहेत. त्यांनी सरकारवर जोरदार टीका केली. रोहित पवार यांनी नुकताच यावर म्हटले की, शेतकऱ्यांच्या कांद्याला हमीभाव मिळावा म्हणून आज शेतकऱ्यांची एकजूट झाली. शेतकरी संघटनेसह विरोधी पक्षाचे नेते उपस्थित आहे. कांद्याला 5 ते सहा रुपये भाव मिळत आहे. हा दर परवडणारा नाही 18 रुपये उत्पादन खर्च आहे. आता कांद्या प्रकरणात दिल्लीमध्ये महत्वाची बैठक पार पडणार आहे.

## पान 4 वरुन

नागरिकांमधून व्यक्त होत आहे. दरम्यान, या प्रकरणी रात्री उशिरापर्यंत तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु होती.

-----------------------------------

ही माहिती मिळताच कुटुंबीयांनी रुग्णालयात हंबरडा फोडला. जोपर्यंत याप्रकरणी गुन्हा दाखल करून मारेकऱ्याला अटक होत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी आक्रमक भूमिका नातेवाईकांनी घेतली होती. मृतदेहाच्या अंगावर मारहाणीचे काळे-निळे वळ स्पष्ट दिसत होते. रविवारी सायंकाळी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. दरम्यान या प्रकरणी मयताची पत्नी संगीता दळवी यांच्या फिर्यादीवरुन आरोपी शेख इरफान शेख समद उर्फ लाला (रा.बालेपीर, बीड) याच्याविरुध्द शिवाजीनगर ठाण्यात ॲट्रासिटी कटासह खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

-----------------------------------------------

शेतकऱ्यांना वेळेत आणि न्याय्य नुकसानभरपाई मिळणे अत्यंत महत्त्वाचे असून, संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्य करून प्रलंबित प्रश्न मार्गी लावावेत, असेही त्यांनी सांगितले.आमदार विजयसिंह पंडित यांनी केंद्र शासनाने पीक विम्यासंदर्भातील रद्द केलेले काही निकष पुन्हा विचारात घेऊन आवश्यक बदल करावेत, अशी मागणी यावेळी केली.

-----------------------------------------

जमीन वाचवा”, “हिंदू धर्मावरील अन्याय बंद करा” अशा घोषणा देत शासनाचा निषेध नोंदविला.या वारकरी दिंडीत महंत ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे (बंकट स्वामी संस्थान, नेकनूर आळंदी पंढरपुरी), महंत ह.भ.प. संभाजी महाराज (उत्तराधिकारी, श्रीक्षेत्र नारायणगड), महंत ह.भ.प. तुकाराम महाराज भारती (बेलेश्वर संस्थान, बेलगाव), रामायणाचार्य ह.भ.प. नाना महाराज कदम, ह.भ.प. सुरेश महाराज जाधव, ह.भ.प. त्रिंबक महाराज मातकर, ह.भ.प. रामेश्वर महाराज जाधव, ह.भ.प. श्रीकृष्ण महाराज उबाळे, ह.भ.प. गोकुळ महाराज उबाळे आदी महंतांची लक्षणीय उपस्थिती होती.तसेच या दिंडीत पांडुरंग महाराज शिंदे, लोखंडे महाराज, ओमतात्या खवतड, सिताराम महाराज, गजानन जोशी, मुकुंदराव खडकीकर, रविंद्र कुलकर्णी, शरद कुलकर्णी, प्रणव राखे, स्वामी महाराज हातळे, श्रीकृष्ण खोसे, महेश मुळीक, जनार्दन महाराज ढेरे, विष्णु घोलप, सुंदर नांगरे, रामहरी घोडके, लग्न महाराज गाडे, अक्षय महाराज मस्के, शरद घोलप, सामाजिक कार्यकर्ते गणेश ढवळे, रामनाथ खोड, शेख युनुस, बाजीराव ढाकणे, राजेंद्र आमटे, संजय शिंदे यांच्यासह मोठ्या संख्येने वारकरी, हिंदूप्रेमी, श्रद्धाळू आणि भाविक सहभागी झाले होते.यावेळी देण्यात आलेल्या निवेदनात “महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम 2026” हा प्रस्तावित कायदा तात्काळ मागे घ्यावा, पुरातन मंदिरे, देवस्थान, मठ, गड आणि संस्थानांच्या जमिनींचे संरक्षण करावे, देवस्थान जमिनींचे डिजिटल अभिलेखीकरण करण्यात यावे, तसेच इनामी आणि देवस्थान जमिनीवरील अतिक्रमण हटविण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी करण्यात आली.तसेच देवस्थानांच्या पारदर्शक व्यवस्थापनासाठी आणि उत्पन्नवाढीसाठी स्वतंत्र धोरण राबवावे, देवस्थान जमिनींसंदर्भात कोणताही निर्णय घेण्यापूर्वी भाविक, विश्वस्त आणि पुजारी यांची सुनावणी घ्यावी, अशाही मागण्या आंदोलनकर्त्यांनी शासनाकडे केल्या.

----------------------------------------

सूत्रधारांवर कठोर कारवाई करून त्यांची संपत्ती जप्त करण्यात यावी तसेच पेपरफुटीमुळे नैराश्यात जाऊन आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणीही केली.

जिल्हाधिकारी बीड यांच्यामार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री आणि मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठविण्यात आले.यावेळी आंदोलनात डॉ. गणेश ढवळे, शेख युनुस, रामनाथ खोड, मुबीन शेख,बाळासाहेब मोरे पाटील, किष्किंधा पांचाळ,सिताबाई भोसले,माजी सैनिक अशोक येडे,सय्यद सादेक, रामधन जमाले, शेख मुबीन, बाजीराव ढाकणे, प्राचार्य डी. जी. तांदळे, गणेश आजबे,नितिन जायभाये,राजु गायके,भिमराव कुंटे, कैलासचंद पालिवाल, रफीक पठाण, सुदाम तांदळे, शेख अमर, नितिन सोनावणे, कालिदास वनवे,आदी उपस्थित होते.डॉ. गणेश ढवळे यांनी सांगितले की, वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न पाहणारे लाखो विद्यार्थी रात्रंदिवस मेहनत घेत असताना कथित पेपरफुटी, निकालातील संशयास्पद बाबी आणि गैरव्यवहारामुळे विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ झाला आहे. शिक्षण व्यवस्थेचे वाढते बाजारीकरण आणि प्रशासनाचा निष्काळजीपणा यामुळे अशा घटना वारंवार घडत असल्याचा आरोप त्यांनी केला.एनटीए संस्थेने विश्वासार्हता गमावली असून ती तात्काळ बरखास्त करावी, दोषींवर कठोर कारवाई करून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी पारदर्शक व सुरक्षित परीक्षा प्रणाली लागू करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

----------------------------------------

जास्त लाभ मिळवून देण्यासाठी अनिल बोर्डे यांनी विविध प्रशासकीय पातळीवर तीव्र संघर्ष केला आहे. केवळ पत्रव्यवहार न थांबता त्यांनी प्रत्यक्ष भेटी घेऊन वेळोवेळी अधिकाऱ्यासोबत सविस्तर चर्चा केल्या व सौर ऊर्जाचा पूर्ण अभ्यास केला. आणि जिल्ह्यातील शेतकरी ग्राहकाची गरज महाराष्ट्र शासन व प्रशासनासमोर वेळोवेळी मांडली. प्रशासन विषय मार्गी लावण्यात कमी पडत असल्यामुळे बोर्डे यांनी थेट मुख्यमंत्री राज्याचे ऊर्जामंत्री यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. बीड जिल्हाला उत्पन्न स्रोत कमी असल्यामुळे बीड जिल्ह्यासाठी विशेष निधी आणि मंजुरी मिळवून घेण्यासाठी त्यांनी शासनावर दवाब गट निर्माण केला. त्यांच्या या अथांग प्रयत्नामुळेच बीड जिल्हा ला योजनेत अग्रस्थान मिळवून देण्यात यश आले. या ऐतिहासिक यशाच्या पार्श्वभूमीवर गेवराई तालुक्यात सौर ऊर्जा योजनेचे श्याम मोरे यांनी एक विशेष पत्रकार परिषद घेतली. यावेळी बोलताना मोरे यांनी अत्यंत आनंद व्यक्त केला आणि “आमच्या सामूहिक प्रयत्नांना अखेर मोठे यश आले आहे ” असे संबोधित केले गेवराई तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यातून 55618 अर्ज प्राप्त झाले आहेत. हा आकडा इतर जिल्ह्याच्या तुलनेतून सर्वाधिक आहे. एवढ्या मोठ्या संख्येने अर्ज येणे हे जिल्ह्यात झालेल्या जनजागृतीचे आणि लोकांच्या बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र पदाधिकारी विश्वासाचे प्रतिक आहे. असे त्यांनी नमूद केले. बीड जिल्हा ने सौर ऊर्जा सारख्या पर्यावरण पूरक आणि शाश्वत विकास योजनेत मिळवलेल्या या प्रथम क्रमांका मुळे जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. या कामगिरी बद्दल अनिल बोर्डे, श्याम मोरे, प्रा. भानुदास फलके ग्राहक पंचायत चे सर्व पदाधिकारी, यांचे सर्व स्तरावरुन भरभरुन कौतुक होत आहे. या योजनेमुळे जिल्ह्यातील हजारो शेतकरी ग्राहकांना उन्हाळ्यात हक्काची आणि दिवसा वीज मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. याप्रकरणी जिल्ह्यातील सर्व मा.संपादक व प्रतिनिधी यांनी वेळोवेळी बातमी प्रसिद्ध करून ग्राहक पंचायत कार्यात मोलाचे सहकार्य केले आहे. या यशात त्यांचा देखील सहभाग आहे.

-----------------------------------------------

भारतीय बौद्ध महासभेचे राज्य संघटक आयु.अमरसिंह ढाका. ॲड हनुमंत कांबळे जिल्हा पर्यटक संघटक बीड,ॲड चंद्रवदन जाधव धम्म महासंघ अध्यक्ष बीड यांनी सहभाग नोंदवून शिबिरातील आपले अनुभव उपस्थित उपासक -उपासिकांना श्रामनेर शिबिरात सहभाग नोंदवणे कसे गरजेचे आहे हे समजावून सांगून त्यांना श्रामनेर शिबिरात सहभाग नोंदवण्यास प्रेरित केले. सत्कार कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आयु.बी. एम. जोगदंड, प्रमुख पाहुणे म्हणून बालाघाट येथील श्रामनेर शिबिर संपन्न करून आलेले प्राध्यापक बी.पी सिरसट लाभले होते. महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम भोले, वाचाल तर वाचाल चे अध्यक्ष डी.जी वानखेडे, ॲड तेजस वडमारे, काशिनाथ वाघमारे, यांची उपस्थिती होती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक समता सैनिक दलाचे मेजर जनरल कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी केले. तथागतांच्या प्रतिमेस पुष्प तर छत्रपती शिवाजी महाराज,डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माता रमाईच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पुष्पदीप धुपाने पूजन करून विनम्र अभिवादन करून सामुदायिक त्रिसरण पंचशील ग्रहण करण्यात आले. शिबिरार्थींचा धम्मदीप बुद्ध विहार बीड व महामानव अभिवादन ग्रुप बीड तर्फे पुष्पगुच्छ देऊन हृद सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ॲड चंद्रवधन जाधव म्हणाले की शिबिरातून तज्ञ अशा गुरुजनांकडून म्हणेज जे अनेक वेळा श्रामनेर झालेले होते, तसेच तज्ञ अशा भिकू संघाकडून मोलाचे मार्गदर्शन मिळाले. त्यातून तथागतांची शिकवण, संयम, शांती, मैत्री, बंधुभाव,समता तसेच त्रिसरण म्हणजे काय? चार आर्य सत्य,अष्टांगिक मार्गाचे जीवनातील महत्त्व,10 पारमितांचे पालन करून माणसाने माणसाशी माणसासारखे कसे वागावे हे समजले.तथागतांचे ज्ञान किंवा गाथा केवळ वाचन नाही तर जीवनात आचरणात आणल्यास सर्वसाधारण माणूस देखील अरहंत पदापर्यंत पोहोचू शकतो असे सर्व समजलेल्या उपदेशा आधारे स्पष्ट केले. तथागतांच्या काळातील परिस्थिती तसेच चक्रवर्ती सम्राट अशोक ते फुले, शाहू,आंबेडकर यांच्या पर्यंतचा घटनाक्रम उपस्थिताना त्यांना समजावून सांगितला. जगात तथागतांच्या मार्गानेच शांतता लाभेल अशी स्पष्ट मत व्यक्त करून डॉ.बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानाचे संरक्षण करून समता, बंधुता, मैत्री व न्याय स्थापन करण्यास सदैव संविधानिक मार्गाने वाटचाल करावी असे अनेक उदाहरणाद्वारे सांगितले. ॲड. हनुमंत कांबळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या समता सैनिक दलाचे महत्व, संविधानिक मार्गाचे कार्य करणे कसे गरजेचे आहे हे सांगितले. जी.एम भोले यांनी समता सैनिक दलात तरुणांचा सहभाग कसा नोंदवावा व समता सैनिक दलाची संख्या कशी वाढवावी याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले व ॲक्शन प्लॅन समजावून सांगितला. कार्यक्रम प्रसंगी मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढ्यात शहीद झालेले पोचीराम कांबळे यांच्या सहचारीनी धोंडामाय कांबळे यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ॲड तेजस वडमारे यांनी व्यक्त केले तर अंजली वडमारे व धम्मदीप महिला मंडळ ग्रुप ने कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता बहुमोल परिश्रम घेतले. कार्यक्रमास अर्चना जाधव, आशाबाई भालेराव, हर्षदा भोसले, सिद्धी भालेराव, पृथ्वी भालेराव बहुसंख्य उपासक उपासिकांची उपस्थिती होती सरणातयणे कार्यक्रमाची सांगता झाली.

--------------------------------------

मुळासकट कोसळली, तर काही ठिकाणी झाडांच्या मोठमोठ्या फांद्या तुटून पडल्याने बागांचे मोठे नुकसान झाले. याशिवाय काही ठिकाणी वीजवाहिन्या खंडित झाल्या असून सोलार पंपाच्या सौर पॅनलचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती इरला येथील ग्रामस्थांनी दिली.अवकाळी पावसासह आलेल्या या वादळी वाऱ्यामुळे आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांचे नुकसान अधिक वाढले आहे. मागील काही दिवसांपासून वातावरणात होत असलेल्या बदलामुळे शेतकरी चिंतेत असतानाच या नैसर्गिक आपत्तीने त्यांच्या अडचणीत आणखी भर घातली आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी बागांचे पंचनामे करून शासनाकडून तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. तसेच प्रशासनाने नुकसानग्रस्त भागांची पाहणी करून तत्काळ मदत जाहीर करावी, अशी मागणी परिसरातील नागरिक व शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

----------------------------------------

यांनी अध्यक्षीय भाषणातून परिचारिका व्यवसायाचे बदलते स्वरूप, आधुनिक आरोग्यसेवेमधील भूमिका आणि संघटित कार्याचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच डॉ. मीनल राणे यांनी परिचारिकांची शपथ सादर केली.

मान्यवरांची उपस्थिती

या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून महाराष्ट्र राज्य परिचारिका शिक्षण मंडळाच्या निबंधक सौ. वैशाली राऊत उपस्थित होत्या. तसेच ‘न्यू होरायझन जर्नल फॉर नर्सेस’चे प्रकाशक व परिचारिका उद्योजक श्री. शुभानंद शिंदे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. मान्यवरांनी आधुनिक आरोग्यसेवा, नर्सिंगमधील संधी, तंत्रज्ञानाचा वापर आणि व्यावसायिक प्रगती याविषयी मार्गदर्शन केले.

जीवनगौरव पुरस्काराने सन्मान

कार्यक्रमातील विशेष आकर्षण म्हणजे ज्येष्ठ परिचारिका सौ. सुरेखा रेवणकर यांना प्रदान करण्यात आलेला “जीवनगौरव पुरस्कार”. नर्सिंग क्षेत्रातील त्यांच्या दीर्घकालीन, उल्लेखनीय आणि समर्पित कार्याचा गौरव म्हणून त्यांना शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह आणि मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

डॉ. सुपर्णा पाटील यांनी सौ. सुरेखा रेवणकर यांच्या व्यावसायिक प्रवासाचे प्रभावी वर्णन केले. हा परिचय कार्यकारिणी सदस्य सौ. मीनल राणे यांनी तयार केला होता. या प्रसंगी सभागृहात अत्यंत प्रेरणादायी व भावनिक वातावरण निर्माण झाले. आपल्या मनोगतात सौ. रेवणकर यांनी परिचारिकांनी सातत्याने ज्ञान, कौशल्य आणि तंत्रज्ञान आत्मसात करून स्वतःला सक्षम बनविण्याचे आवाहन केले.

विशेष म्हणजे एनएनएमसी, ॲक्टरेक, जे.जे., कामा, सेंट जॉर्ज, एलटीएमजी, डी.वाय. पाटील, टेर्ना आणि नायर रुग्णालयातील सुमारे 30 निवृत्त परिचारिकांचाही यावेळी सन्मान करण्यात आला.

आकर्षक सजावट व सांस्कृतिक कार्यक्रम

टेर्ना कॉलेज ऑफ नर्सिंगच्या आयोजन समितीने कार्यक्रमस्थळी अत्यंत देखणी आणि व्यावसायिक सजावट केली होती. फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांच्या प्रतिमेसह आकर्षक व्यासपीठ, दीपप्रज्वलन, फुलांची सजावट आणि टीएनएआयचा थीम बॅनर यामुळे कार्यक्रमाला विशेष शोभा प्राप्त झाली.

दीपप्रज्वलन समारंभाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर स्वागतगीत, अध्यक्षीय भाषण, शपथवाचन, सत्कार समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम आणि आभारप्रदर्शन अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. दीपप्रज्वलन समारंभाने ज्ञान, सेवा, करुणा आणि समर्पण या परिचारिका व्यवसायाच्या मूल्यांची पुनःप्रचिती दिली.

विविध स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद

आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनानिमित्त नवी मुंबईतील विविध नर्सिंग महाविद्यालयांमध्ये साहित्यिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. रंगोली, मोनो ॲक्ट, माईम, वक्तृत्व, निबंध, चित्रकला, क्विझ, फॅन्सी ड्रेस अशा विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

तसेच फेब्रुवारी 2026 मध्ये आयोजित क्रीडा स्पर्धांमध्ये कॅरम, बुद्धिबळ, क्रिकेट, धावणे, रिले, भालाफेक, गोळाफेक, लिंबू-चमचा यांसारख्या स्पर्धांचाही समावेश होता. विजेत्यांना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ नर्सिंगला “सर्वोत्कृष्ट संस्था” हा मानाचा करंडक प्रदान करण्यात आला.

20 संस्थांचा सांस्कृतिक सहभाग

नर्सिंग विद्यार्थिनी व परिचारिकांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी संपूर्ण सभागृह भारावून गेले. शैक्षणिक व सेवा क्षेत्रातील एकूण 20 संस्थांनी समूह नृत्य आणि विविध कलाविष्कार सादर करून परिचारिका क्षेत्रातील एकता, सर्जनशीलता आणि सांस्कृतिक समृद्धीचे दर्शन घडविले.

कार्यक्रमाचा समारोप उपाध्यक्षा डॉ. प्रभा दासिला यांच्या आभार प्रदर्शनाने व राष्ट्रगीताने झाला. या कार्यक्रमास सुमारे 400 प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यकारिणी सदस्य डॉ. सविया फर्नांडिस, डॉ. ज्योती चौधरी, डॉ. दीपा रेड्डी, डॉ. शैलजा दाते, डॉ. दीपाली उमाले, श्री. गणेश गुरव तसेच विविध रुग्णालये व नर्सिंग महाविद्यालयांचे प्रमुख आणि प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रम दुपारी सुमारे 3.30 वाजता उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

------------------------------------

होती, त्यावेळी त्यांनी ‘महाराष्ट्र राज्य ढोलकी फड तमाशा संघटनेचे’ अध्यक्ष म्हणून पुढाकार घेत कलावंतांच्या हक्कांसाठी मोठा लढा दिला.

अनेक दशकांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत रघुवीर खेडकर यांनी प्रतिकूल परिस्थितीतही कलेशी तडजोड केली नाही. ग्रामीण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाऊन त्यांनी तमाशाच्या माध्यमातून सामाजिक संदेश देण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या अभिनयातील कसदारपणा आणि संवादफेकीतील धार यामुळे त्यांनी रसिक प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. केवळ मनोरंजनच नव्हे, तर तमाशा या कलेला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. त्यांनी शेकडो कलाकारांना आपल्या मार्गदर्शनाखाली घडवून त्यांना व्यासपीठ मिळवून दिले आहे, ज्यामुळे अनेक नवीन पिढीचे कलाकार आज लोककलेच्या क्षेत्रात कार्यरत आहेत.

तमाशा हा महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा आहे. अनेकदा लोककलाकारांकडे दुर्लक्ष होते, अशी खंत व्यक्त केली जाते. अशा वेळी रघुवीर खेडकर यांच्यासारख्या धुरंधर कलावंताला मिळालेला ‘पद्मश्री’ सन्मान हा केवळ त्यांच्या वैयक्तिक कार्याचा गौरव नसून, तो संपूर्ण तमाशा फडाचा आणि महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा झालेला सन्मान आहे. यामुळे लोककलेकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक होईल, अशी भावना व्यक्त होत आहे.

पद्मश्री प्रदान होताच राज्यभरातील नाट्य, चित्रपट आणि साहित्य क्षेत्रातून रघुवीर खेडकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ज्येष्ठ कलाकारांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करताना म्हटले आहे की, “हा पुरस्कार खऱ्या अर्थाने लोककलेचा मान उंचावणारा आहे. खेडकर यांनी तमाशा या कलेला जी उंची मिळवून दिली, ती पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल.”

रघुवीर खेडकर यांना मिळालेला हा सन्मान तमाशा कलेला एक नवी ऊर्जा देणारा ठरेल आणि मराठी लोकसंस्कृतीच्या इतिहासात त्यांच्या या कार्याची नोंद सुवर्णअक्षरांनी केली जाईल, यात शंका नाही.

--------------------------------------------

जनतेच्या मनात निर्माण होणाऱ्या विश्वासातून मिळतो. त्यामुळे श्री घुगे यांनी डॅशिंग, निष्पक्ष आणि जनतेसाठी तत्पर पोलिस अधिकारी म्हणून आपली छाप निर्माण करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

किल्ले धारुर पोलिस स्टेशन हे बीड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाचे पोलिस स्टेशन मानले जाते. त्यामुळे गुन्हेगारांना पाठीशी न घालणे, अवैध धंदेवाल्यांना अभय न देणे, गरीब व सामान्य नागरिकांना त्रास होणार नाही याची काळजी घेणे आणि चोरी, वाटमारी, गुंडगिरी तसेच माफियाराजावर कायद्याच्या चौकटीत कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले.

तसेच पोलिस स्टेशनचे दरवाजे सर्वसामान्य जनतेसाठी सदैव खुले ठेवून लोकाभिमुख प्रशासन उभे करावे, अशी अपेक्षाही तालुक्यातील नागरिकांतून व्यक्त होत आहे.

धारूर तालुक्यातील तमाम जनतेच्या वतीने API श्री राजेंद्र घुगे यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

-------------------------------

हॅलो बीड
परळी
संघर्षनेता
बुधवार दि. 27 मे 2026

# अवैध वाळू उपसा करताना तरुणाचा पाण्यात बुडून मृत्यू

## गेवराई तालुक्यातील घटना; प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे वाळूमाफिया मोकाट



टाकरवण : गेवराई तालुक्यातील तपेनीमगाव येथील गोदावरी नदीपात्रात अवैध वाळू उपशाच्या केणीवर कामासाठी गेलेल्या एका तरुणाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची रविवारी घडली. सोमवारी सकाळी या तरुणाचा मृतदेह सापडला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून अवैध वाळू उपशाच्या प्रकारांवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

सतीश किसन भोंगदळ (वय 35, रा. टाकरवन, ता. माजलगाव) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. रविवारी दुपारच्या सुमारास सतीश भोंगदळ हा तपेनीमगाव येथील गोदावरी नदीपात्रात वाळू उपशासाठी वापरण्यात येणाऱ्या केणीवर कामासाठी गेला होता. दोरखंडाला केंग बांधण्यासाठी तो नदीपात्रात उतरला असताना अचानक तो बेपत्ता झाला. ही माहिती परिसरात पसरताच एकच खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच कुटुंबीयांसह ग्रामस्थांनी नदीकाठाकडे धाव घेतली. नदीकाठावर सतीश याचे कपडे व मोबाईल आढळून आल्याने तो पाण्यात बुडाल्याची भीती व्यक्त करण्यात आली. त्यानंतर तलवाडा पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. सोमवारी सकाळपासून गोदावरी नदीपात्रात शोधमोहीम राबविण्यात आली. स्थानिक मच्छीमार, ग्रामस्थ, अग्निशमन दलाचे पथक तसेच प्रशासनाच्या मदतीने शोधकार्य सुरु होते.

अखेर सोमवारी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास सतीश भोंगदळ याचा मृतदेह नदीच्या पाण्यावर तरंगताना आढळून आला. त्यानंतर मृतदेह बाहेर काढून जातेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आला.

या घटनेमुळे टाकरवन परिसरात शोककळा पसरली असून अवैध वाळू उपशामुळे अनेकांचे जीव धोक्यात येत असल्याची भावना पान 3 वर

# खून झालेल्या कामगाराचा मृतदेह थेट पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर

## नातेवाईक संतप्त, दुकान मालकावर गुन्हा दाखल, अटकेची मागणी




बीड : शहरातील नगर रोडवरील एका दारु दुकानात काम करणाऱ्या कामगाराचा शनिवारी (दि.23) मध्यरात्री सुमारास मारहाणीनंतर मृत्यू झाला. उमेश नवनाथ दळवी (वय 38, रा. गोरेवस्ती, बालेपीर, बीड) असे मृत कामगाराचे नाव आहे. दरम्यान दुकान मालकाने बेदम मारहाण केल्यानेच पतीचा मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप मृत उमेश यांच्या पत्नी संगीता दळवी यांनी केला होता. अखेर या प्रकरणी त्यांच्या फिर्यादीवरुन दुकान मालकाविरुध्द ॲट्रासिटी ॲक्ट व इतर कलमानुसार 25 मे रोजी पहाटे पावणेतीन वाजता बीडच्या शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

मयत उमेश दळवी हे शहरातील नगर रोडवरील एका पत्र्याच्या शेडमध्ये चालविल्या जाणाऱ्या दारु दुकानात मागील दोन वर्षापासून काम करत होते. शनिवारी मध्यरात्री उमेश यांना बालेपीर परिसरातून रुग्णवाहिकेतून उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल केले गेले, मात्र तत्पूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता. मयताच्या पत्नीला ही माहिती फोनवरुन देण्यात आली होती.

दरम्यान रविवारी सकाळी पान 3 वर

# बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याची नुकसानभरपाई मिळण्यासाठी तातडीने निर्णय घ्या - कृषिमंत्री दत्तात्रय भरणे



मुंबई, दि. 26 : प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत खरीप हंगाम 2025 मधील बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळण्याबाबत बँका आणि विमा कंपन्यांसोबत तातडीने बैठक घेऊन योग्य निर्णय करण्यात यावेत, अशा स्पष्ट सूचना कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिल्या.

मंत्रालयात आयोजित बैठकीत प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम न मिळाल्याच्या प्रश्नावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी आमदार विजयसिंह पंडित, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, कृषी संचालक विनयकुमार आवटे तसेच शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते.

कृषिमंत्री भरणे म्हणाले की, खरीप हंगाम 2025 पासून राज्यात सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना उत्पादन आधारित पद्धतीने आणि पीक कापणी प्रयोगांच्या आधारे राबविण्यात येत आहे. बीड जिल्ह्यात या योजनेची अंमलबजावणी आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इन्श्युरन्स कंपनी लिमिटेडमार्फत करण्यात येत असून, पिकांच्या नुकसानभरपाईसाठी एसडीआरएफ आणि एनडीआरएफच्या निकषांनुसार कार्यवाही केली जाते. पान 3 वर

# देवस्थान इनाम कायद्याविरोधात बीडमध्ये वारकरी दिंडी; कायदा रद्द करण्याची जोरदार मागणी




बीड, 26 मे (हिं.स.)।महाराष्ट्र सरकारच्या "महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम 2026" या प्रस्तावित कायद्याविरोधात बीड शहरात सकल वारकरी समाज व मंदिर संरक्षण समितीच्या वतीने वारकरी, भाविक, श्रद्धाळू आणि हिंदू धर्मप्रेमींनी जोरदार आंदोलन छेडले.

हिंदू धर्मातील पुरातन मंदिरे, देवस्थान, मठ, गड आणि संस्थानांच्या जमिनी संपुष्टात आणण्याचा सरकारचा डाव असल्याचा आरोप करत हा प्रस्तावित कायदा तात्काळ रद्द करावा, या प्रमुख मागणीसाठी मंगळवारी (दि.26) छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय अशी भव्य वारकरी दिंडी काढण्यात आली. जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले.

देवस्थान इनाम जमिनी या केवळ मालमत्ता नसून त्या धार्मिक, सामाजिक व ऐतिहासिक व्यवस्थेचा आधारस्तंभ असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. देवस्थाने ही केवळ पूजा-अर्चेची ठिकाणे नसून धर्मप्रसार, संस्कृती संवर्धन, समाजजागृती आणि सामाजिक एकात्मतेची केंद्रे आहेत. प्रस्तावित अधिनियमामुळे देवस्थानांच्या मालमत्तेवर अतिक्रमण, अनाधिकृत हस्तांतरण आणि व्यापारीकरण वाढण्याची शक्यता असून भविष्यात प्रभावशाली पुढारी व धनदांडग्यांच्या ताब्यात या जमिनी जाण्याचा धोका असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.

टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि विठ्ठल नामाच्या जयघोषात निघालेल्या दिंडीने शहराचे वातावरण भक्तिमय झाले होते. आंदोलनकर्त्यांनी "देवस्थान पान 3 वर

# बीड - नीट पेपरफुटी प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने




बीड, 26 मे देशभर गाजत असलेल्या नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबा गणेश कर यांच्या नेतृत्वाखाली बीडमधील विविध सामाजिक, राजकीय क्षेत्रातील नागरिक व सुजाण बीडकरांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिलाच पाहिजे एनपीए प्रशासन मुर्दाबाद, भ्रष्ट शिक्षण व्यवस्था मुर्दाबाद, पेपरफुटी करणा-यांची संपत्ती जप्त करा आदी जोरदार घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली.

या आंदोलनात एनटीए संस्था बरखास्त करावी, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारुन राजीनामा द्यावा तसेच नीट पेपरफुटी प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांमार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशा मागण्या करण्यात आल्या.

आंदोलनकर्त्यांनी पेपरफुटीच्या पान 3 वर

# सौर ऊर्जा योजनेत राज्यात बीड जिल्हा प्रथम

## बीड जिल्ह्यात गेवराई प्रथम ; अनिल बोर्डे व शाम मोरे यांच्या अथग प्रयत्नांना यश.



गेवराई ( प्रतिनिधी) महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वकांक्षी सौर ऊर्जा योजनेची प्रभावी अंमलबजावणी करुन बीड जिल्हाने संपूर्ण राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच बीड जिल्ह्यात गेवराई तालुका यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यामुळे शेतकरी ग्राहका मध्ये आनंदाचे वातावरण आहे. या मध्ये बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष अनिल बोर्डे आणि योजनेचे गेवराईचे समन्वयक श्याम मोरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे यश प्राप्त झाले आहे. बीड जिल्ह्यातून 55 618 अर्ज दाखल झाले असून सर्वच अर्ज निकाली निघाले आहेत. गेवराई तालुक्यातील चालू महिन्यात 103 अर्ज राहिले आहेत. त्यामुळे गेवराई तालुका बीड जिल्हात प्रथम आला आहे. जिल्ह्यात चालू महिन्यात सध्या फक्त 503 अर्ज शिल्लक आहेत. गेल्या महिन्यात 324 05 सौर ऊर्जा पंप बसविण्यात आले आहेत. या यशाबद्दल संपूर्ण जिल्ह्यातून कौतुक होत आहे. बीड जिल्ह्याला सौर ऊर्जा लाभ मिळण्यासाठी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र शासन, मुख्य अभियंता, महासंचालक महाऊर्जा पुणे, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उप कार्यकारी अभियंता गेवराई यांच्याकडे वारंवार दिनांक 9 /1/2024 पासून जिल्ह्याला सौर ऊर्जा योजनेचा जास्तीत पान 3 वर

# तमाशासम्राट रघुवीर खेडकर यांना 'पद्मश्री' सन्मान

## महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा गौरव



प्रतिनिधी:नवी दिल्ली:महाराष्ट्राच्या मातीतील अस्सल लोककला 'तमाशा' क्षेत्रासाठी एक ऐतिहासिक आणि अभिमानास्पद क्षण म्हणजे तमाशा पंढरीचे आधारस्तंभ आणि खेडकरांच्या तमाशा मंडळाचे ज्येष्ठ कलावंत रघुवीर खेडकर यांना केंद्र सरकारने प्रतिष्ठेच्या 'पद्मश्री'पुरस्काराने सन्मानित केले आहे. लोककलेच्या क्षेत्रात दिलेल्या प्रदीर्घ, निस्वार्थी आणि अमूल्य योगदानाची दखल घेत भारत सरकारने या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांच्या कारकिर्दीवर मोहोर उमटवली आहे.

तमाशा सम्राट रघुवीर खेडकर यांचे नाव तमाशा विश्वात एका वटवृक्षासारखे आदराने घेतले जाते. खेडकर कुटुंब हे महाराष्ट्राच्या तमाशा परंपरेतील एक अग्रगण्य नाव आहे. रघुवीर खेडकर यांनी वडील ज्येष्ठ तमाशा कलावंत तुकाराम खेडकर आणि आई तमाशा सम्राज्ञी कांताबाई सातारकर यांच्याकडून मिळालेला कलेचा वारसा केवळ जतन केला नाही, तर तो अत्यंत समर्थपणे पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवला.

त्यांच्या कुटुंबाचे योगदान केवळ एका व्यक्तीपुरते मर्यादित नसून, संपूर्ण खेडकर घराण्याने दशकानुदशके तमाशा फडाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्राचे प्रबोधन केले आहे. रघुवीर खेडकर यांच्यासोबत त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांनीही या लोककलेला ग्लॅमर आणि प्रतिष्ठा मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तमाशा फडातील शिस्त, वगनाट्याची मांडणी आणि लावणीच्या सादरीकरणातील शुद्धता राखण्यासाठी खेडकर कुटुंबाने नेहमीच अग्रक्रम दिला आहे.

तमाशा क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना 'तमाशा महर्षी' म्हणून ओळखले जाते. त्यांनी तमाशाचा वापर केवळ मनोरंजनासाठी न करता सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यासाठी आणि प्रबोधनासाठी केला आहे.

कोरोना महामारीत तमाशा कलावंतांवर उपासमारीची वेळ आली पान 3 वर

# श्रामनणेर शिबिरातून समता, संयम व शिस्तीचे उत्तम संस्कार मिळतात अमरसिंह ढाका...

## (चैत्यभूमी श्रामनेर शिबिरार्थीचा धम्मदीप बुद्ध विहारात सत्कार.)



बीड (प्रतिनिधी) श्रामणेर शिबिरातून समता, संयम व शिस्तीचे उत्तम संस्कार मिळतात असे उद्गार अमरसिंह ढाका यांनी मुंबई येथे श्रामनेर शिबिरात सहभाग नोंदवलेल्या शिबिरार्थींच्या धम्मदीप बुद्ध विहार येथील सत्कार प्रसंगी अनुभव सांगताना प्रतिपादन केले. तथागतांचे तत्वज्ञान त्यांच्या वाणीतून निघालेल्या अनमोल पाली भाषेतील गाथेतून समजतात. गृहस्थी जीवनातील उपासक-उपासिका व बालकाकरता त्यांचे तत्त्वज्ञान समजण्याकरिता भारतीय बौद्ध महासभेने चैत्यभूमी दादर मुंबई येथे दहा दिवसीय श्रामनेर शिबिर आयोजित केले होते त्या शिबिरात बीड शहरातील पान 3 वर

# वादळी वाऱ्याचा इरला परिसराला तडाखा

## • आंब्यासह अनेक झाडे जमीनदोस्त; सोलार पंपाच्या सौर पॅनलचे मोठे नुकसान



माजलगाव : माजलगाव तालुक्यातील इरला (म) परिसरासह अनेक गावांना दि. 23 मे 2026 रोजी सायंकाळी झालेल्या अवकाळी वादळी वाऱ्याचा मोठा फटका बसला. सायंकाळी पाचच्या सुमारास अचानक आलेल्या जोरदार वाऱ्यामुळे परिसरातील जनजीवन काही काळ विस्कळीत झाले.

वादळी वाऱ्याच्या तडाख्याने आंबा, लिंब, चिंच यांसारखी मोठमोठी झाडे उन्मळून पडली असून अनेक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. हातातोंडाशी आलेल्या आंब्याच्या बागांचे नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

अनेक ठिकाणी फळांनी लगडलेली आंब्याची झाडे पान 3

# टीएनएआय मिलेनियम सिटी शाखा, नवी मुंबई तर्फे आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन 2026 उत्साहात संपन्न




नवी मुंबई : The Trained Nurses Association of Indiaच्या मिलेनियम सिटी शाखा, नवी मुंबईतर्फे आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन 2026 अत्यंत उत्साहपूर्ण, दिमाखदार आणि व्यावसायिक वातावरणात साजरा करण्यात आला. हा भव्य सोहळा दिनांक 13 मे 2026 रोजी सेक्टर-22, नेरुळ येथील Terna Dental Collegeच्या सभागृहात सकाळी 9.30 वाजल्यापासून आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश परिचारिकांनी आरोग्यसेवा, रुग्णसेवा, शिक्षण, नेतृत्व व सामाजिक बांधिलकी क्षेत्रात दिलेल्या अमूल्य योगदानाचा गौरव करणे हा होता. नवी मुंबईतील विविध नर्सिंग महाविद्यालये, रुग्णालये, शिक्षक, परिचारिका व विद्यार्थी मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी झाले होते. संपूर्ण कार्यक्रमातून परिचारिका व्यवसायातील समर्पण, करुणा, व्यावसायिकता आणि संघटित शक्तीचे प्रभावी दर्शन घडले.

कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी शाखाध्यक्ष सौ. स्नेहलता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारिणी सदस्यांच्या तीन नियोजन बैठका घेण्यात आल्या होत्या. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन डॉ. प्रतिभा आठरे, प्राचार्या, टेर्ना कॉलेज ऑफ नर्सिंग यांनी केले. शाखाध्यक्ष सौ. स्नेहलता जाधव पान 3 वर

# सत्कारापेक्षा कामातून ओळख निर्माण करा : API राजेंद्र घुगे यांच्याकडून धारूरकरांच्या अपेक्षा



धारूर । बाबुराव तिडके

किल्ले धारूर पोलिस स्टेशनला गेल्या पंधरा वर्षांपासून कायमस्वरूपी पोलिस निरीक्षक पदाची नियुक्ती नसून, अतिरिक्त पोलिस निरीक्षक (API) यांच्याकडेच कारभार सोपविण्यात येत आहे. अशा परिस्थितीत गेल्या अडीच वर्षांपासून API म्हणून कार्यरत असलेले श्री देविदास वाघमोडे यांनी आपल्या धडाकेबाज व कर्तव्यदक्ष कामगिरीतून धारूर तालुक्यात कायदा व सुव्यवस्थेचा मजबूत धाक निर्माण केला होता.

गुन्हेगारांना कोणतीही पाठीशी न घालता कठोर कारवाई, अवैध धंद्यांवर नियंत्रण आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करण्याचे काम त्यांनी केले. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत जिल्हा पोलिस अधीक्षक तसेच वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या हस्ते त्यांना विविध पारितोषिके व सन्मान देण्यात आले होते.

आता नव्याने धारूर पोलिस स्टेशनचा पदभार API श्री राजेंद्र घुगे यांनी स्वीकारला आहे. त्यांच्या आगमनानंतर विविध स्तरातून सत्कार होत असले तरी, केवळ सत्कार स्वीकारण्यापेक्षा आपल्या कामातून स्वतंत्र ओळख निर्माण करणे अधिक महत्त्वाचे असल्याची भावना धारूर तालुक्यातील नागरिकांतून व्यक्त होत आहे.

राजकीय नेते व पुढाऱ्यांकडून सत्कार होणे ही वेगळी बाब असली तरी, खरा सन्मान सर्वसामान्य पान 3 वर